## • खालापूर पोलीस ठाणे, जि.रायगड कॉ.गु.रजि.नं. I २८६/२०१६, भा.दं.सं.क.३०२, २०१, ३६४,३४ या गुन्हयाची हकिगत :-

दिनांक २५/१२/२०१६ रोजी ११.४५ वा.चे सुमारास चौक रेल्वे स्टेशन, ता.खालापूर येथून कळविण्यात आले की, "चौक ते कर्जत रेल्वे ट्रॅकवर पोल नं. ८९ ते ९१ चे दरम्यान एक माणूस मयत अवस्थेत पडलेला आहे." अशी माहिती मिळाल्याने खालापूर पोलीस ठाण्याचे अंकित असलेल्या चौक पोलीस दुरक्षेत्रावरील हजर अंमलदार यांनी मिळालेल्या माहितीची खातरजमा केली. प्राप्त माहिती खरी होती. अनोळखी पुरुष जातीच्या प्रेतावरील जखमा, प्रेताची स्थिती, घटनास्थळावरील वस्तुस्थिती यावरुन सदरचा प्रकार हा खूनाचाच असल्याची खात्री झाल्याने प्रथम खालापूर पोलीस ठाणे I कॉ.गु.रजि.नं.३०२,२०१ प्रमाणे अज्ञात आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर अनोळखी पुरुष जातीच्या प्रेताच्या अंगावरील कपडयांची बारकाईने पाहणी करता त्याच्या शर्टच्या खिशामध्ये एक सिंडीकेट बँकेचे दि.२३/१२/२०१६ रोजीचे १८.१३.१० अशा वेळेची, २४०/- रुपयांचे सेल, "**नरेंद्र कुलकर्णी**" असे व इतर लिहीलेली पावती, व त्या पावतीच्या पाठीमागील बाजूस सद्दाम सय्यद-९६७३३१४२१३ असे इंग्रजीत लिहीलेले मिळून आले. त्यावरुन सिंटीकेट बँकेत जावून सदरचे बील हे कोणत्या बँक खात्यातून वर्ग झाले आहे, त्याबाबत माहिती घेतली असता ते "दि बारामती सहकारी बँक लि., शाखा-धनकवडी" या बँकेतील "श्री.नरेंद्र प्रविण कुलकर्णी, रा.३७,नित्यानंद सोसा., बालाजी नगर, धनकवडी, पुणे-४३" यांच्या खाते क्र.१०३४३ यातून वर्ग झाल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या पत्त्यावर जावून सदरचे खाते धारक श्री.नरेंद्र प्रविण कुलकर्णी यांचेबाबत माहिती मिळविली असता ते दि.२४/१२/२०१६ पासून घरी आले नसून त्यांच्याची कोणत्याही प्रकारचा संपर्क होत नसल्याचे त्यांची आई सौ.मंजिरी प्रविण कुलकर्णी यांनी सांगितले. त्यांना खालापूर पोलीस ठाण्याचे हद्दीत दि.२५/१२/२०१६ रोजी एक अनोळखी पुरुषाचा जखमी अवस्थेतीतील मृतदेह सापडला असून तो प्राथमिक आरोग्य केंद्र, खालापूर येथील शीतशवागृहात राखून ठेवला असून त्याची ओळख पटविण्याकरीता आपले नातेवाईकांना घेवून या, असे सांगितले. त्याप्रमाणे त्या स्वत: तसेच त्याचे पती श्री.प्रविण गणेश कुलकर्णी व त्यांची सुन श्रावणी नरेंद्र कुलकर्णी आणि त्यांचे इतर नातेवाईक असे प्राथमिक आरोग्य केंद्र, खालापूर येथे येवून त्यांनी तो मृतदेह हा त्यांचा मुलगा नरेंद्र प्रविण कुलकर्णी, वय-३२ वर्षे याचाच असल्याचे सांगितले. **अशा प्रकारे अतिशय जुजबी पुराव्याचे आधारे अज्ञात मयताची गुन्हा दाखल झाल्यापासून केवळ २४ तासांच्या आंत ओळख पटवून मृतदेह त्यांच्या रक्ताचे नातेवाईकांच्या ताब्यात सुपुर्द केला.**

यांतील मयत याची पत्नी व वडील यांनी मयताचा मृतदेह नि:संशयीतपणे ओळखला परंतु मयताची आई सौ.मंजिरी प्रविण कुलकर्णी या द्विधा मनस्थितीत होत्या. त्यामुळे गुन्हयातील मयताची पक्की ओळख पटविण्याचे अनुषंगाने त्याचे डी.एन.ए. तपासणीकरीता राखून ठेवलेल्या नमुन्यांशी श्री.प्रविण गणेश कुलकर्णी आणि सौ.मंजिरी प्रविण कुलकर्णी यांचे डी.एन.ए. नमुने पडताळण्यासाठी पाठविले.

... २/-

त्यानंतर गुन्हा दाखल झाल्यानंतर म्हणजे दि.२६/१२/२०१६ ते १७/०६/२०१७ रोजी पर्यंत गुन्हयातील साक्षीदार, संशयीत आरोपी यांच्याकडे तपास करणे, त्यांच्या हलचालींवर बारकाईने लक्ष ठेवणे अशाप्रकारे गुन्हा उघडकीस आणण्याच्या अनुषंगाने, वरील कर्मचा-यांचे तपास पथक तयार करुन सदर गुन्हयाचा तपास सुरु केला. गुन्हयातील आरोपीत यांनी अतिशय सराईतपणे गुन्हा केला होता व त्यांनी पाठीमागे एकही पुरावा सोडलेला नव्हता. सदर गुन्हयातील मुख्य आरोपीत हेमंत सुरेश विचारे, वय-२९ वर्षे, रा.३४/४, शिवाई अर्पा., १ला मजला, फ्लॅट नं.२, मोहननगर,धनकवडी, पुणे याने त्याचा स्वत: चा वापरता मोबाईल फोन हा घटनेच्या दिवशी पुणे येथेच ठेवून देवून पोलीसांची तपासामध्ये दिशाभुल होईल, अशी तजविज केली होती. परंतु त्याच्या वर्तनाबाबत व चारित्र्याबाबत गोपनिय माहिती मिळवली असता त्याचे व यांतील मयत याची पत्नी श्रीमती श्रावणी नरेंद्र कुलकर्णी यांचे अनैतिक संबंध असल्याचे तपासामध्ये आढळून आले.

त्यानंतर नमुद संशयीत इसम हेमंत सुरेश विचारे याचेकडे प्राथमिक तपास करुन, त्याची घटनेच्या दिवशीची माहिती घेतली. तथापी तो सांगत असलेली हकिगत व तपासामध्ये प्राप्त केलेली गोपनिय माहिती आणि घटनेपुर्वी अाणि घटनेनंतरच्या हालचालींबाबत सी.डी. आर.द्वारे प्राप्त केलेली माहिती यामध्ये तफावत आढळून आली. दरम्यानच्या कालावधीत त्याच्या हालचालींवर गोपनियता पाळून बारकाईने लक्ष ठेवले.

दरम्यानच्या कालावधीत यांतील मयत व त्यांचे आई-वडील यांचा डि.एन.ए. तपासणी अहवाल प्राप्त झाला व यांतील मयत व्यक्ती हा "नरेंद्र प्रविण कुलकर्णी" हाच असल्याचे वैज्ञानिकरित्या स्पष्ट झाले.

त्यानंतर यांतील संशयीत इसम हेमंत सुरेश विचारे याचा सी.डी.आर. त्या आधारे दिसून येत असलेल्या घटनेपुर्वी अाणि घटनेनंतरच्या त्याच्या हालचालीं व डी.एन.ए. रिपोर्ट प्राप्त होईपर्यंतच्या कालावधीमध्ये त्याच्याबाबत केलेल्या गोपनिय तपासाच्या आधारे मिळवलेली माहिती या सर्वांचा एकत्रित अभ्यास करुन व त्यांची सांगड घालून, प्रश्नावली तयार केली. त्यानंतर त्यास दि.१७/०६/२०१७ रोजी ०८.२३ वा. अटक करुन त्याचेकडे वरील बाबींच्या अनुषंगाने कौशल्यपुर्ण तपास करुन, त्याची मानसिकता भंग केली. त्यानंतर त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबूली देवून, त्याचे गुन्हयातील इतर साथीदारांची नावे सांगितली. त्यावरुन (१) दत्ता लाला लोखंडे, वय-३२ वर्षे, रा.सहकारनगर, पद्मावती तळजाई वसाहत, सुवर्ण शनी मारुती मंदिराजवळ, पुणे यास दि. दि.१७/०६/२०१७ रोजी ०८.२३ वा. (२) रोहित राजू गायकवाड, वय-२५ वर्षे, रा.ताकई बौध्दवाडा, पो.साजगांव, ता.खालापूर यास दि.१७/०६/२०१७ रोजी १४.०७ वा. (३) विशाल उर्फ चिक्या विवेक भोसले, वय-३२ वर्षे, (४) विशाल उर्फ लावा गुलचंद कसबे, वय-२७ वर्षे, दोन्ही रा.इंदिरानगर लोअर, बिबवेवाडी, पुणे (५) सचिन रामचंद्र भोसले, वय-३० वर्षे, रा.भानजव-बौध्दवाडा, खोपोली, ता.खालापूर यांना दि.१८/०६/२०१७ रोजी १८.२० वा. (६) अमित चंद्रकांत पवार, वय-२३ वर्षे, रा. फ्लॅट नं.१, जयश्री को.ऑ.सोसा., मामा ऐनपूरेनगर, धनकवडी, पुणे यास दि.२३/०६/२०१७ रोजी २१.४९ वा. असे एकुण ०७ आरोपींना गुन्हयात अटक केली.

वरील नमुद सर्व आरोपी यांनी, त्यांचा सदर गुन्हयातील सहभाग कबूल करुन, गुन्हयाचा घटनाक्रम आणि त्यांनी गुन्हयात पार पाडलेली भुमिका नमुद केली. त्याप्रमाणे नमुद आरोपी यांच्याकडुन गुन्हयाचे अनुषंगाने पुरावे, गुन्हयात त्यांनी वापरलेली हत्यारे, वाहने इत्यांदी साधने कोठून उपलब्ध केली, याबाबत माहिती घेवून ती हत्यारे, वाहने इत्यादी शासकिय पंचांसमक्ष भारतीय पुरावा कायदा कलम २७ अंतर्गत पंचनाम्याने हस्तगत करण्यात आली आहेत.

गुन्हयाचे अन्वेषण अधिकारी श्री.जे.ए.शेख, पो.नि., खालापूर पो.ठाणे यांनी गुन्हयाचे तपासात निष्पन्न झालेल्या सर्व साक्षीदार यांच्याकडे गुन्हयाचे अनुषंगाने तपास केला आहेत. तसेच महत्वाचे साक्षीदार यांचे मा.न्यायालयासमक्ष सी.आर.पी.सी.कलम १६४ प्रमाणे जबाबसुध्दा नोंदविलेले आहेत. अशाप्रकारे गुन्हयाचा सर्वतोपरी तपास करुन, सबळ व भरपूर पुरावा प्राप्त करुन, अटक आरोपीताविरुध्द मा.जिल्हा संनियंत्रण समिती, अलिबाग-रायगड यांच्या पुर्वपरवानगीने, मुदतीत मा. न्यायालयात दोषरोप पत्र दाखल केलेले आहे.

अशा प्रकारे सदरचा गुन्हा उपरोक्त नमुद तपास अधिकारी व त्यांच्या पथकाने अथक, कौशल्यपुर्ण तपास व तपासामध्ये सातत्य ठेवून, उघडकीस आणलेला असून त्याकामी वरील नमुद पो.नि.श्री.जे.ए.शेख, तपास अधिकारी व त्यांचे सहकारी अधिकारी-अंमलदार यांनी त्यांचेसमोर दर्शविलेली कामगिरी योग्यरित्या व जबाबदारीने पार पाडलेली आहे. अशा प्रकारे त्यांनी त्यांचे अंगी असणारे व्यवसायीक कौशल्य व चिकाटीचे उत्कृष्ट प्रदर्शन करुन, अतिशय गंभीर व किचकट गुन्हा उघडकीस आणण्याची अत्युत्कृष्ठ कामगिरी केली आहे. या त्यांच्या उत्कृष्ठ कामगिरीमुळे जनमाणसामध्ये पोलीसांची प्रतिमा उज्वल झाली असून याबाबत मा.पोलीस महासंचालक सो., महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचेकडील आदेश क्रमांक पोमसं/२३/५४/गुणात्मक अन्वेषण-बक्षीसे/४२२-२०१७/२०१८, दिनांक १४/६/२०१८ अन्वये माहे मे-२०१७ ते डिसेंबर-२०१७ या कालावधीतील "गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोकृष्ट प्रयत्न" याकरीता निवड करुन तपास पथकास पारितोषीकाने सन्मातीन करुन त्यांचे कौतूक केलेले आहे.

••••••••••••••••••••






महाराष्ट्र पोलीस

